# मावळमध्ये विजयाची गुढी उभारू - आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल (प्रतिनिधी) आगामी लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीचे उमेदवार ॲड.राहुल नार्वेकर यांना मतांची आघाडी देवून मावळ लोकसभा मतदार संघामध्ये विजयाची गुढी उभारू असा निर्धार आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी येथे व्यक्त केला. पनवेल तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीची बैठक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हाध्यक्ष आर.सी.घरत यांच्या मार्गदर्शनाखाली मार्केट यार्डमधील श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पार पडली. त्याप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, उमेदवाराची भिस्त कार्यकर्त्यांवर असते, त्यामुळे आघाडीचा धर्म पाळून प्रत्येक कार्यकत्याने सक्रीय व्हावे. स्वार्थी राजकारण करून स्वतःची पोळी भाजणाऱ्या शेकापक्षाची खोटी निती जनतेसमोर मांडून येत्या निवडणुकीत शेकापला त्यांची जागा दाखवून देवू. भाजपने ज्येष्ठांची अहवेलना करून केवळ जाहिरातबाजीत आघाडी घेतली आहे, मात्र बाकी सगळीकडे मोदींची पिछाडीच दिसून येत आहे, अशा शब्दात येथील लोकल पक्ष शेकाप आणि दिशाहिन झालेल्या भाजपचा त्यांनी खरपूस समाचार घेतला.कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस ही एकाच रथाची दोन चाके आहेत, त्यामुळे कार्यकर्त्यांनी समज-गैरसमज दूर ठेवून देशाच्या एकजुटीसाठी आणि विकासासाठी आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्यावे, असे आवाहनही आ.ठाकूर यांनी यावेळी केले.

यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, शेकापक्षाने आजवर जे पेरले त्याची फळे त्यांना भोगावी लागतील. गरज असले की जवळ करायचे आपलं हेतू साध्य झाला की वाऱ्यावर सोडून द्यायचे हेच धोरण शेकाप पुढाऱ्यांनी अवलंबले आहे. शेकापने पुढे केलेले लक्ष्मण जगताप यांचा मावळमध्ये कधीही संपर्क नव्हता, त्यांना जनता स्विकारणार नाही असे सांगून मावळमध्ये कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीच्या माध्यमातून विकास झाला आहे. त्यामुळे सध्या मावळमध्ये आघाडीचेच वर्चस्व आहे. आघाडीने दिलेले उमेदवार ॲड.राहुल नार्वेकर सुशिक्षित मनमिळावू आणि आपल्यातलेच आहेत त्यांना येथील जनतेने स्विकारले आहे. आर्थिक दृष्टया गरिब असले तरी मतांच्या दृष्टीने ते श्रीमंत आहेत त्यांना मावळ मतदार संघातून ६0 हजार मतांची आघाडी मिळेल, असा विश्वास लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष आर.सी.घरत यांनी सांगितले की, संपूर्ण देशामध्ये प्रत्येकाच्या वेगवेगळया भावना आणि विचार असले तरी आघाडीने दिलेला उमेदवार हा आपलाच समजून श्रेष्ठींच्या आदेशाचे तंतोतंत पालन करून प्रत्येक कार्यकर्त्याने कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीच्या उमेदवाराला बहुमताने विजयी करावे, असे आवाहन केले. प्रतिष्ठेची निवडणुक समजून कॉंग्रेस राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी एकसंघ भावनेने आघाडीचा धर्म पाळा. प्राणपणाने कामाला लागून मावळ लोकसभा मतदार संघातून ॲड.राहुल नार्वेकर यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन ज्येष्ठ कामगार नेते श्याम म्हात्रे यांनी केले.

या बैठकीस तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, प्रवक्ते शशिकांत बांदोडकर, कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, जिल्हा परिषदेतील पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, पनप गटनेते अनिल भगत, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक संतोष शेट्टी, माजी बांधकाम सभापती तथा नगरसेवक मनोहर म्हात्रे, मगरसेवक गणेश पाटील, गणपत म्हात्रे, नगरसेविका कल्पना ठाकूर, निर्मला म्हात्रे, सिता पाटील, स्मिता पाटील, संगिता कांडपाल, शहर कॉंग्रेसच्या महिला अध्यक्षा वर्षा नाईक, तालुका कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर कार्याध्यक्षा सुहासिनी शिवणेकर, सुहासिनी केकाणे, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, सिध्दीका पुंजानी, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, नविन पनवेल विभागीय अध्यक्ष कुमार नाईक, ज्येठ नेते बाबूशेठ भोईर, जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष सुदाम पाटील, मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, मानव संसाधन विभागाचे जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अमीर सय्यद, ज्येष्ठ नेते बबन जगनाडे, सुभाषचंद्र शिरोळकर, अनेष ढवळे, शरद खारकर, शिवाजी दुर्गे, डि.एन.यादव, गोविंद पाटील, डि.एन.मिश्रा, बशिर पटेल आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.